# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.03.2024** **वारःरविवार**

---

1. लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात 10 उमेदवारांचे अर्ज दाखल.
2. गेल्या 10 दिवसांत 1 लाख 84 हजार 841 नवमतदारांची राज्यात नोंद.
3. राज्यभरात होळीचा उत्साह; रंगपंचमीसाठी बाजारपेठा सजल्या.
4. हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत हरियाना अजिंक्य, महाराष्ट्र उप-विजेता. आणि
5. आगामी काही दिवसांत राज्यातील काही भागात तापमानाचा पारा वाढणार.

**लोकसभा अर्ज**

राज्यात आतापर्यंत 10 जणांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरले आहेत. नागपूरमध्ये 5, रामटेकमध्ये 1, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर मतदारसंघात प्रत्येकी दोघांनी उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली.

राज्यात आतापर्यंत 23 कोटी रुपयांची रोख रक्कम, 17 लाख लीटर मद्य, 700 किलो अंमलीपदार्थ, 46 किलो सोनं चांदी आणि मोफत वाटायच्या 1 लाखांहून अधिक वस्तू जप्त केल्याची माहितीदेखील त्यांनी यावेळी दिली. यात मुद्देमालाची तपासणी सुरू असून कायदेशीर असलेला मुद्देमाल संबंधितांना परत केला जाईल, असं ते म्हणाले. राज्यातल्या 13 हजार 141 व्यक्तींवर भारतीय दंड संहितेअंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई झाली आहे. परवाना नसलेली 308 शस्त्रं जप्त करण्यात आली असून परवाना असलेली 45 हजार 755 शत्र ताब्यात घेणं, जप्त करणं किंवा आवश्यकतेनुसार वापरण्याची परवानगी दिली आहे. राज्यात परवाना दिलेली 77 हजार 148 शस्त्र असून उर्वरित शस्त्रांची पडताळणी सुरू असल्याचं ते म्हणाले.

राज्यात 98 हजार मतदान केंद्र उभारली जाणार असून निवडणूक जाहीर झाल्यापासून 1 लाख 84 हजार 841 मतदारांची राज्यात नोंद झाल्याची माहिती एस. चोकलिंगम यांनी  दिली आहे. लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या 10 दिवस आधीपर्यंत मतदार यादीत नाव नोंदवता येत असून अधिकाधिक व्यक्तींनी मतदार यादीत नाव नोंदवावं, मतदार यादीतल्या नावाची पडताळणी करावी आणि मतदान करावं असं आवाहनदेखील त्यांनी केलं. राज्यातील 48 लोकसभा मतदारसंघासाठी एकंदर पाच टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येणार आहे.

**उमेदवार**

उमेदवार निवडीसाठी भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीची काल नवी दिल्लीत बैठक झाली. उमेदवारांच्या नावावर तीन तास चर्चा झाली. दरम्यान, काँग्रेसनं आपल्या 45 उमेदवारांची आणखी एक यादी काल प्रकाशित केली आहे.

**लक्षद्वीप**

लोकसभा निवडणुकीत भाजपा लक्षद्वीपमध्ये अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देणार असल्याचं भाजपानं स्पष्ट केलं आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी ही माहिती दिली आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी एकजुटीने लढणार असून या निवडणुकीत यश मिळवेल, असंही तावडे यांनी म्हटलं आहे. दरम्यान कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून छत्रपती शाहू महाराज निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांना वंचित बहुजन आघाडीने जाहीर पाठिंबा दिला आहे. विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

**उमेदवार-अमरावती**

अमरावतीमधील लोकसभेची जागा भाजपा उमेदवार लढवणार असल्याचं निश्चित झालं असून त्यावर लवकरच चर्चेअंती नाव घोषित करण्यात येईल असं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपुरात माध्यम प्रतिनिधींसोबत बोलताना सांगितले. महायुतीचे 13 पक्ष मिळून निवडणूक लढविणार असून 51 टक्के मतं मिळतील असा विश्वास बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

**होळी**

होळी, रंगपंचमीनिमित्त राज्यातल्या बाजारपेठा सजल्या आहेत. होळीसाठी आलेले रंग, पिचकाऱ्या यांची दुकानं सर्वत्र दिसत आहेत. त्यात रासायनिक रंगांपेक्षा नैसर्गिक रंगांना मागणी असल्याचं दिसून येत आहे. परभणीच्या वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनीही मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक रंग तयार करून त्याची विक्री केली. सिंधुदुर्ग जिल्हयात 538 सार्वजनिक तर 598 अशा एकंदर 1136 ठिकाणी होळीच पूजन होणार आहे. काही गावात मानपानावरून वाद असल्यानं अशा गावात पोलीस प्रशासनानं निर्बंध घातले आहेत. होळी उत्सवासासाठी मोठया प्रमाणात चाकरमानी दाखल होऊ लागले आहेत. जिल्ह्यात गावागावात रोंबाट, रंगपंचमी आणि वेगवेगळ्या वेशभूषेतील नाच- गाणी हे कोकणातल्या शिमग्याचं प्रमुख आकर्षण आहे.

**शिमगोत्सव-रत्नागिरी**

होळी तसंच धुलिवंदनासाठी सर्वत्र बाजारपेठा सज्ज झाल्या आहेत. आज होलिका दहन तर उद्या धुलिवंदनाचा सण साजरा होत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातदेखील अत्यंत उत्साहात आणि वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने हा सण साजरा केला जातो. त्याविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी...

**वसंत ऋतूच्या आगमनाची लागलेली चाहूल आणि आंब्या-काजूच्या बागांमधल्या मोहराचा सुगंध भरून राहिलेल्या रत्नागिरी जिल्ह्यात सध्या गावोगावी एका वेगळ्याच उत्साहाचं वातावरण आहे. पारंपरिक शिमगोत्सव हे त्या उत्साहाचं कारण. फाल्गुन शुद्ध पंचमी म्हणजे फाक पंचमीला फाका मारून अर्थात आरोळ्या ठोकून नांदी झालेला हा उत्सव गुढीपाडव्यापर्यंत सुरू असतो. नोकरी-व्यवसायानिमित्त कोकणाबाहेर असलेले चाकरमानी शिमग्यात मोठ्या प्रमाणात आपापल्या गावी येतात. या कालावधीत ग्रामदैवतांच्या पालख्या सजवल्या जातात आणि ढोल-ताशांच्या गजरात त्या घरोघरी नेल्या जातात, त्यांचं पूजन केलं जातं. एरव्ही देवदर्शनासाठी देवळात जावं लागतं; मात्र या दिवसांत प्रत्यक्ष देवच भक्तांच्या घरी येतो. काही गावांमध्ये पालखी घरोघरी न जाता सहाणेवर म्हणजे एका ठरावीक ठिकाणी ठेवली जाते आणि गावकरी तिथे दर्शन घेतात. त्या त्या गावातल्या प्रथेनुसार त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंतच्या काळात होळीचा प्रत्यक्ष सण साजरा होतो. संकासुर येतात. नमन-खेळ्यांसारख्या लोककला सादर होतात. ग्रामदैवतांच्या पालख्या खांद्यावर किंवा डोक्यावर घेऊन नाचवल्या जातात. काही ठिकाणी दोन गावांमधल्या पालख्यांची भेट होते आणि त्या एकत्र नाचवल्या जातात. भावा-बहिणीची भेट किंवा तत्सम लोककथा हे त्यामागचं कारण असतं. काळानुसार काही बदल झाले असले, तरी उत्सव दर वर्षी त्या त्या गावातल्या मूळ प्रथा-परंपरेनुसार साजरा होतो. एकोप्याची भावना वृद्धिंगत करणारा रत्नागिरीतला हा सण म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

पुण्यातही होळीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा सजल्या असून यंदा होळी पौर्णिमेच्या दिवशी चंद्रग्रहण असलं तरी हे चंद्रग्रहण भारतात दिसणार नाही. त्यामुळे ग्रहणाचे कोणतेही नियम पाळण्याची आवश्यकता नसल्याचं पंचांगकर्ते मोहन दाते यांनी म्हटलं आहे.

**शहिददिवस**

देशभरात काल शहीद दिवस पाळण्यात आला. 23 मार्च 1931 रोजी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन स्वातंत्र्यसेनानींना फाशी देण्यात आली. यानिमित्तानं राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन इथं त्यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या स्वातंत्र्यसेनानींना आपापल्या

निवासस्थानी पुष्पहार अर्पण करत अभिवादन केलं. पुणे जिल्ह्यातील राजगुरूनगर इथं शहीद सुखदेव यांच्या निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर,नवी मुंबई महानगरपालिका, बीड, परभणीसह विविध ठिकाणीदेखील शहीद दिनाच्या अनुषंगाने अभिवादन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**कसबा**

कोणतेही तर्कसंगत कारण न देता पुण्यातील कसबा मतदारसंघातील महाविकास आघाडी सरकारनं मंजूर केलेली विकासकामं रद्द करून त्याचा निधी पर्वती मतदारसंघातील विकासकामांसाठी वळवण्याचा राज्य सरकारचा निर्णय उच्च न्यायालयानं शुक्रवारी बेकायदेशीर ठरवून रद्द केला. कसबा विधानसभा मतदारसंघातील विकासनिधी रद्द केल्याबाबत आमदार रवींद्र धंगेकर यांनी न्यायालयात धाव घेतली होती. याशिवाय कसबा मतदारसंघातील कार्यादेश काढलेली आणि न काढलेली विकासकामेही येत्या आर्थिक वर्षात कोणतंही कारण पुढे न करता लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आदेशही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठानं दिला.

**आबा बागूल**

निष्ठावंताला डावलून पक्षाबाहेरून आलेल्या रवींद्र धंगेकर यांना काँग्रेसने पुणे लोकसभेची उमेदवारी दिली असा आरोप करत माजी उपमहापौर आबा बागुल यांनी काँग्रेस भवनात महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर उपोषण सुरू केले आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी न्याय यात्रा काढली. मात्र, पुण्यात 40 वर्षे काम करणाऱ्या पक्षातल्या निष्ठावंतांवर अन्याय झाला. निष्ठावंतांना न्याय नसेल, तर न्याय यात्रेचा उपयोग काय,' असा प्रश्न बागूल यांनी उपस्थित केला आहे.

**हॉकी**

14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत हरियानानं यजमान महाराष्ट्र संघाचा पेनल्टी शूट आउटमध्ये 3-0 अशा फरकानं पराभव करत विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. स्पर्धेत सुरुवातीला हरियाणा संघाने 1-0 अशी आघाडी घेतली मात्र उत्तरार्धात महाराष्ट्राच्या अक्षता ढेकळेनं गोल करत बरोबरी साधली. यानंतर पेनल्टी शूट आउट मध्ये महाराष्ट्राला एकाही संधीचं गोलमध्ये रूपांतर करता आलं नाही तर हरियानानं तीन गोल करत विजय साकार केला. तिसऱ्या स्थानासाठीच्या झालेल्या लढतीत झारखंड संघ विजेता ठरला.

**होळी-उष्मा**

होळी पौर्णिमेपासून उन्हाच्या झळा जाणवू लागतात. यंदा गेल्या किमान 15 ते 20 दिवसांपासूनच हवामानातील उष्मा वाढला असून आगामी काही दिवसांत पुण्यासह राज्यातील काही भागात तापमानाचा पारा 39 ते 40 अंशापर्यंत पोहोचेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. प्रामुख्यानं दिवसाच्या तापमानात वाढ होत असल्यानं हा उष्मा जाणवत असल्याचं हवामान विभागानं स्पष्ट केलं आहे. नागरिकांनी घराबाहेर पडताना उन्हापासून बचावाची साधने वापरावीत त्याचबरोबर शक्यतो ताज्या अन्नाचे सेवन करावं असं आवाहन देखील तज्ज्ञांकडून करण्यात आलं आहे.

**हवामान**

मालेगाव इथं सर्वाधिक 40 पूर्णांक 8 अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आज आणि उद्या ढगाळ वातावरण राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.